# महात्मा गांधीजी यांचे सत्याग्रह विषयक विचार

**श्री चंद्रहास लक्ष्मण हिप्परकर**, अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर.

**प्रा. डॉ. विनय दत्तात्रय धोंडगे**, प्राध्यापक, आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा.

**सारांश**

सत्याग्रह ही महात्मा गांधीजींच्या तत्त्वज्ञानातील एक प्रमुख व महत्त्वाची संकल्पना आहे. सत्याग्रह हा महात्मा गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा आधार होता. त्यांच्या मते मानवाने सत्याचा आग्रह धरावा. सत्य, अहिंसा, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह यावर श्रद्धा असणारी व्यक्ती खरी सत्याग्रही असते.आत्मशुद्धी, आत्मक्लेश, अपरिग्रह, निर्भयता, चिकाटी, उपवास, ब्रह्मचर्य, निर्धार इत्यांदी सत्याग्रहाचे आधार त्यांनी सांगितले आहेत. असहकार, सविनय कायदेभंग, हरताळ, उपोषण, बहिष्कार, हिजरत, निरोधने, धरणे यासारखे अनेक सत्याग्रहाचे मार्ग महात्मा गांधीजींनी सांगितले आहेत. सत्याग्रहात वैयक्तिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय समस्या सोडविण्याची सुप्त शक्ती असते त्यामुळे महात्मा गांधीजींनी सत्याग्रह म्हणजे समस्या सोडविण्याची गुरुकिल्ली आहे असे सत्याग्रहाचे वर्णन केलेले आहे. सत्याग्रहाला प्रत्यक्ष कृतीचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणून गांधीजींच्या राजकीय विचारात सर्वश्रेष्ठ स्थान प्राप्त झालेले असून सत्याग्रह हा अहिंसात्मक पद्धतीने युद्ध करण्याचा तो एक मार्ग आहे. सत्याग्रह हे अहिंसात्मक संघर्षाचे सर्वात मोठे शस्त्र आहे.

**कळीचे शब्द**- सत्याग्रह, सत्य, अहिंसा, असहकार, सविनय, हरताळ

**प्रस्तावना**

भारतीय तत्त्वज्ञान व संस्कृती यांचे निष्ठावंत उपासक व भाष्यकार,स्वातंत्र्यसंग्रमात अहिंसेचा मार्ग जोपासणारे, सत्याग्रहाचा आग्रह धरणारे, दलितांचे कैवारी, भारतीय जनतेचे अनभिषिक्त सम्राट, मानवतेचे पुजारी, श्रेष्ठ तत्त्वचिंतक, थोर समाजसेवक, महान राजकारणी, प्रतिभावंत साहित्यिक, एक कला उपासक, निसर्ग उपासक, कायदेतज्ज्ञ आणि थोर शिक्षणतज्ज्ञ असे परिपूर्ण व व्यासंगी व्यक्तिमत्व म्हणजे मोहनदास करमचंद गांधी होय. त्यांनी साधी राहणी व उच्च विचारसरणी या न्यायाने आपले जीवन घालविले. जनसेवा हीच ईश्वर सेवा होय. यावर त्यांची पूर्ण श्रद्धा होती.गांधीजींच्या मते हिंसेशिवाय लढाई करता येते व ती जिंकता येते हेच एक सत्याग्रहाचे प्रमुख कार्य आहे. ते एक नैतिक शस्त्र असून त्याचा आधार आत्मबल आहे. महात्मा गांधीजींनी १९२२ मध्ये यंग इंडिया या वृत्तपत्रात सत्याग्रहाचा अधिकार व महत्त्व याविषयी सविस्तर वर्णन केले आहे. त्यांनी इंग्रजाविरुद्ध लढताना सत्याग्रहाचा प्रभावी व परिणामकारक वापर केला होता.

**१. महात्मा गांधीजींचे सत्यविषयक विचार -**

सत्य हा महात्मा गांधीजींच्या विचारांचा आत्मा होता. सत्याची सवय लहानपणापासूनच अंगी बाणविण्यातच त्यांचा कल होता. त्यांच्या मते सत्य हे मानवी जीवनातील सर्वोत्तम मूल्य आहे. त्यांनी सत्याचे दोन प्रकार सांगितले आहेत.

**१. सापेक्ष सत्य**- या सत्याची ओळख व्यक्तीला परिस्थितीनुसार होते. तसेच हे सत्य परिस्थितीसापेक्ष असते.हे सत्य बदलणारे असते.

**२. निरपेक्ष सत्य -** या सत्याला सार्वभौम सत्य असेही म्हणतात. सत, चित, आनंद या त्रयींचा समन्वय यामध्ये झालेला असतो. हेसत्य पूर्ण नैतिक असते.

**२. सत्याग्रहाचा अर्थ-**

'महात्मा गांधीजीनी सत्याग्रहाच्या रुपात सामूहिक लढ्याचे तंत्र जगाला दिले. दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांच्या लढ्याला नेमके काय नाव द्यावे याविषयीच्या मंथनातून सत्याग्रह हा शब्द गांधीजींना सापडला आहे'.

'सत्याग्रह या संकल्पनेत सक्रिय प्रतिकार अभिप्रेत आहे. कारण त्यामध्ये हिंसाचाराची शक्यता नसते. तेथे हिंसाचाराचे रूपांतर प्रेम, विश्वास व त्याग यामध्ये होत असते.सत्याग्रहात शक्ती असते मात्र ती नैतिक असते. सत्याग्रहात मानसिक हिंसा किंवा बळजबरी नसते'.

"सत्याग्रह म्हणजे सत्याचा आग्रह होय". तो अहिंसात्मक युद्धाचा मार्ग आहे. अहिंसात्मक मार्गाने दुसऱ्याचेहृदय परिवर्तन घडवून आणणे यास सत्याग्रह म्हणतात.

"सत्याग्रह म्हणजे अन्याय, जुलूम, शोषण याविरुद्ध केलेला आत्मिकशक्तीचा आविष्कार होय".

गांधीजींच्या मते सत्याग्रह म्हणजे सत्यपरायण असणे होय. अर्थात सत्याला चिटकून राहणे होय. म्हणूनच सत्याग्रह हे सत्याचे बळ होय आणि सत्य हे आत्मचैतन्य असल्यामुळे सत्याग्रह हे आत्मबळही आहे. महात्मा गांधींजी सत्याग्रहाला प्रेमाचे सामर्थ्य असेही म्हणतात. कारण सत्याग्रही चूक करणाऱ्याला सुधारू शकतात. सत्याग्रही हा पूर्णाशांने अहिंसक व निर्भय असतो.

जे 'शक्ती' आणि 'सक्तीच्या' जोरावर मिळवले जाते ते केवळ 'शक्ती' आणि 'सक्तीच्या' आधारावरच राखले जाऊ शकते. त्यामुळे 'सत्याग्रह' हा अधिक शाश्वत आणि चिरायू असा मार्ग आहे. 'सत्य' आणि 'अहिंसेच्या' मीलनातून निर्माण झालेले ते अत्युच्च्य सामर्थ्य आहे.

**३.सत्याग्रहीची पात्रता / सत्याग्रहाचे आधार**

महात्मा गांधीजींनी सत्याग्रह करण्यासाठी सत्याग्रहीच्या ठिकाणी पुढील पात्रता असावी असे सांगितलेआहे.

१. **आढळ श्रद्धा** - सत्याग्रहीची ईश्वरावर व सत्याग्रहावर आढळ श्रद्धा असावी. तरच तो यशस्वी होऊ शकतो.

२. **सत्याग्रहाचे तत्व** -ज्यांच्यावर अन्याय झाला असेल त्यांनीच सत्याग्रह करावा. हे सत्याग्रहाचे सारभूत तत्व आहे.

३. **अभिलाषा नसावी**-सत्याग्रहीला संपत्ती, प्रसिद्धी व प्रतिष्ठा यांची अभिलाषा नसावी.

४. **ब्रह्मचर्य** -सत्याग्रहीचे आरोग्य उत्तम असावे. त्याने ब्रह्मचर्य धर्माचे पालन करावे.कामवासनेचा प्रतिकार करून तिच्यावर विजय मिळवावा.

५. **निर्भयता**-सत्याग्रही निर्भिड व ध्येयनिष्ठ असावा. तिच्या मनात कसल्याही प्रकारची भीती असू नये.

६. **निर्धार**- सत्याग्रहीचा निर्धार पक्काअसला पाहिजे. निर्धाराशिवाय सत्याग्रह यशस्वीच होऊ शकत नाही.

७. **निस्वार्थी** -सत्याग्रही स्वार्थी नसावा. तो निस्वार्थी असावा.

८. **प्रेम व आदर**- सत्याग्रहीच्या मनात विरोधकाविषयी प्रेम व आदराची भावना असावी.

९. **चिकाटी**- सत्याग्रहात अनेक अडचणी येतात, त्यावर मात करणे आवश्यक आहे. त्रास सहन केल्यावरच सत्याग्रहप्राप्ती होते. यासाठी चिकाटी आवश्यक आहे.

**१०. अपरिग्रह व अस्तेय** - अपरिग्रह म्हणजे भौतिक सुखाचा त्याग करणे, तर अस्तेय म्हणजे चोरी न करणे. सत्याग्रहीने या दोन्ही तत्वांचा स्वीकार करावा. असे महात्मा गांधीजींनी म्हटले आहे.

**११. उपवास** - उपवास हे आत्मशुद्धीचे साधन आहे. उप म्हणजे जवळ तर वास म्हणजे राहणे. ईश्वराच्या जवळ राहणे हा उपवासाचा अर्थ आहे. यामुळे मानवाचे शरीर, आत्मा, मन,शुद्ध होते.

**१२. आत्मशुद्धी** - आत्म्याची पवित्रता, चारित्र्याची शुद्धता व अंत:करणाची निर्मलता यातून साध्य होते.

**१३. आत्मक्लेश** -आत्मक्लेशामुळे व्यक्तीचे आत्मबळ वाढते. सत्याग्रही व्यक्तीची आत्मक्लेश सहन करण्याची तयारी असणे आवश्यक आहे.

**१४. भावनांच्या आहारी जाऊ नये** -हेवा, द्वेष, मत्सर, घृणा, क्रोध इत्यादी भावनांच्या आहारी जाऊ नये. भावनांच्या आहारी जाऊन आपल्या मार्गापासून तो विचलित होणारा नसावा.

**४. सत्याग्रहाचे मार्ग किंवा तंत्रे / साधने -**

महात्मा गांधीजींनी सत्याग्रहाचे मार्ग खालील प्रमाणे सांगितले आहेत.

**१.असहकार**

असहकार म्हणजे वाईट कृत्यातसहभागी होण्यास नकार देणे. असहकार फक्त अहिंसकच मार्गाने करावयाचा असतो.महात्मा गांधीजींनी १९२० मध्ये असहकार चळवळ सुरू केली. गांधीजींनी असहकार चळवळ सुरू करून इंग्रजांना राजकीय प्रतिकार करण्यास सुरुवात केली होती.१९२० च्या नागपूर येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात असहकाराचा ठराव पास झाला होता. असहकारामध्ये ब्रिटिश किताब, सन्माननीय पदव्या इत्यादीचा त्याग करणे,

सरकारी उत्सव कार्यक्रम यावर बहिष्कार घालणे, सरकारी शिक्षण संस्थांमधून मुलांना काढून घेणे, कोर्ट कामकाजावर बहिष्कार घालणे, भारतीय सैनिकांनी काम नाकारणे, कायदेमंडळावर बहिष्कार घालणे, विदेशी वस्तूवर बहिष्कार घालणेया बाबींचा समावेश होतो. अशा प्रकारे महात्मा गांधीजींनी अत्याचारी शासन नष्ट करण्यासाठी सरकारशी असहकाराचा लढा सुरू केला होता.

**२.सविनय कायदेभंग**

महात्मा गांधीजींनी 'हेनरी डेव्हिड ऑफ सिव्हिल डिसी सिडन्स' या निबंधातून सविनय कायदेभंग ही संकल्पना घेतली आहे. सविनय कायदेभंग करणे हा व्यक्तीचा जन्मसिद्ध हक्क आहे असे सांगून १९३० मध्ये सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली. सॉक्रेटिस, थोरो, टॉलस्टॉय यांच्या विचारापासून महात्मा गांधीजींनी कायदेभंगाची प्रेरणा घेतली.१९३० चा मिठाचा सत्याग्रह हे सविनय कायदेभंगाचे उत्तम उदाहरण आहे. नम्रतापूर्वक कायद्याचा भंग करणे यास महात्मा गांधीजींनी सविनय कायदेभंग म्हटले आहे.

**३.उपोषण**

उपोषण हे सत्याग्रहाचे प्रभावी साधन असून ते योग्य वेळी वापरावयाचे असते. उपोषण म्हणजे स्वतः आत्मक्लेश स्वीकारून, सहन करून दुसऱ्यांचे हृदय परिवर्तन किंवा मन परिवर्तन घडवून आणणे होय. उपोषण हे शस्त्र फारच स्फोटक व प्रभावी असल्याने त्याचा दुरुपयोग होणार नाही याविषयी काळजी घ्यावी लागते. महात्मा गांधीजींनी १९३३ मध्ये हरिजनांची सेवा अधिक चांगल्या प्रकारे करता यावी म्हणून २१ दिवस आत्मशुद्धीचे उपोषण केले होते. तसेच १९४७ मध्ये हिंदू मुस्लिम ऐक्यासाठी उपोषण केले होते. अस्पृश्यता निवारणासाठी तसेच जातीय मतदारसंघाची रचना मागे घेण्यासाठी गांधीजींनी उपोषणाचा मार्ग स्वीकारला होता.

**४. बहिष्कार**

महात्मा गांधीजींच्या मते बहिष्कार हे सत्याग्रहाचे प्रमुख व महत्त्वाचे साधन होय. राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रातही या मार्गाचा स्वीकार करून सत्याग्रह करावा. विलायती माल, कायदेमंडळ, न्यायमंडळ, शाळा, महाविद्यालये, कचेरी इत्यादीवर बहिष्कार टाकून सरकारला प्रतिकार केला होता. बहिष्कारच्या तंत्राने एखाद्या व्यक्तीचा अवमान किंवा अपमान होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक असते. बहिष्कार हा कोणाच्याही दबावाने अगर हिंसात्मक मार्गाने टाकू नये असे महात्मा गांधीजी म्हणतात.

**५. हरताळ / संप**

महात्मा गांधी यांच्या मते जनतेच्या व सरकारच्या निदर्शनास एखादी गोष्ट आणून देण्यासाठी हरताळ हा मार्ग वापरावा. हा मार्ग ऐच्छिक असावा. हरताळच्या दिवशी व्यापार, व्यवसाय, शिक्षण संस्था, कारखाने, वाहतुकीची साधने इत्यादी सर्व व्यवहार बंद ठेवावेत. अत्यावश्यक सेवा शक्यतो त्यातून वगळाव्यात. हरताळ स्वेच्छेने झाले पाहिजेत ते दबावाने घडवून आणता येत नाही. लक्ष वेधण्यासाठी ऱ्हदय परिवर्तन घडवून आणण्यासाठी लोकांनी या मार्गाचा क्वचित प्रसंगी अवलंब करावा.

**६. हिजरत /प्रदेश त्याग**

महात्मा गांधीजींच्या मते हिजरत म्हणजे देशत्याग / प्रदेशत्याग किंवा स्थलांतर करणे होय. एखाद्या प्रदेशात किंवा भागात जनतेवर सतत अत्याचार, जुलूम, अन्याय, जबरदस्ती होत असेल, त्यांचा सतत मानभंग होत असेल आणि अहिंसात्मक मार्गाने प्रतिकार करणे अशक्य होत असेल तर त्या जनतेने तो प्रदेश किंवा भाग सोडून दुसऱ्या प्रदेशात किंवा भागात जाणे यास हिजरत म्हणतात.१९२८ व १९३९ मध्ये बारडोली, जुनागड, विठ्ठलगड व लिंबाडी येथील जनतेला महात्मा गांधीजींनी हिजरतचा सल्ला दिला होता.

**७. निरोधने / प्रतिबंध**

निरोधन म्हणजे प्रतिबंध करणे होय. मतपरिवर्तन घडवून आणणे होय. शासनाकडून अथवा एखाद्या व्यक्तीकडून अन्याय,अत्याचार होऊ लागला तर निरोधनाचा मार्ग स्वीकारून शासनाला किंवा व्यक्तीला त्याच्या कृतीची जाणीव करून द्यावी. निरोधनावेळी सामर्थ्याचा वापर करू नये. विरोध दर्शवून मतपरिवर्तन घडवून आणणे हा निरोधनाचा

मुख्य हेतू असतो. विदेशी मालावर बहिष्कार व दारूबंदी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गांधीजींनी निरोधनाचा मार्ग स्वीकारला होता.

**८. धरणे**

धरणं धरणे म्हणजे समाजातील एखाद्या अन्यायी, अत्याचारी व्यक्तीला जननिंदेद्वारे लज्जित करणे होय. अशा व्यक्तीची चूक समाजाच्या नजरेस आणून त्या व्यक्तीला ती चूक कळावी असा उद्देश धरणे या सत्याग्रहाच्या तंत्राचा असतो. यामध्ये कोणत्याही प्रकारची अतिरेकीकृती असत नाही.

**९. करबंदी**

महात्मा गांधीजींनी करबंदी हा एक सत्याग्रहाचा मार्ग सांगितलेला आहे. अन्यायी सरकारने लादलेले कर भरण्यास जनतेने नकार द्यावा. हा मार्ग आर्थिक क्षेत्रासाठी उपयोगी आहे.

अशा प्रकारे सत्याग्रहाचे विविध मार्ग सांगून त्याचा प्रत्यक्ष अवलंब महात्मा गांधीजींनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत केलेला आहे.

**समारोप**

महात्मा गांधीजींनी सत्याग्रहाचा प्रथम वापर दक्षिण आफ्रिकेत केला. सत्याग्रह हे अहिंसात्मक संघर्षाचे सर्वात मोठे शस्त्र आहे. सत्याग्रहाच्या रुपाने महात्मा गांधीजींनी युद्धाला व हिंसाचाराला पर्याय तर दिलाच शिवाय भारतालाच नव्हे तर संपूर्ण जगाला अन्यायाच्या विरोधात लढण्यासाठी अहिंसात्मक शस्त्र दिले. महात्मा गांधीजींनी सामुदायिक सत्याग्रहाला अधिक महत्त्व दिले आहे."मारेंगे नही, लेकिन मानेंगी भी नही" या निर्धाराने सत्याग्रहाचा प्रयोग केला जावा अशी त्यांची धारणा होती. सत्याग्रहाच्या विविध साधनांचा, तंत्रांचा वापर करून महात्मा गांधीजींनी ब्रिटिश सत्तेशी सतत संघर्ष केला आणि स्वातंत्र्य प्राप्ती केली. यातूनच त्यांच्या सत्याग्रह या तत्त्वाचे सामर्थ्य व महत्त्व समजून येते.

**संदर्भ :**

1. माळी, अ.ल. आणि भगत,रा.तु. (१९७८) थोर शिक्षणतज्ज्ञ. पुणे, गो.य. प्रकाशन
2. कुंडले, म. बा. (१९८६) शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र. पुणे, श्रीविद्या प्रकाशन.
3. पवार, जयसिंगराव (१९९९) हिंदुस्थानच्या स्वांतत्र्य चळवळीचा इतिहास. कोल्हापूर, फडके प्रकाशन
4. भगत, रा. तु. (२००५) शिक्षणातील थोर विचारवंत. कोल्हापूर, चैतन्य प्रकाशन
5. पवार,ना.ग. (२००७) उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षणतज्ज्ञ. पुणे, नित्यनूतन प्रकाशन तांबोळी, शमसुद्दिन आणि तांबोळी, बेनझीर (२०११) प्रभावशाली शिक्षणतज्ज्ञ. पुणे, डायमंड प्रकाशन
6. राजमाने, कस्तुर चंद्रकांत (२०११) शिक्षणातील थोर विचारवंत : एक चिंतन. नाशिक, इनसाईट पब्लिकेशन्स
7. पवार, वैशाली (२०१४) आधुनिक भारतीय राजकीय विचार. पुणे, डायमंड पब्लिकेशन्स
8. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक (२००१) आधुनिक भारताचा इतिहास
9. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक (२००२) आधुनिक भारतातील राजकीय वारसा
10. https://www.sbsscollegebegusarai.com/course_mterials
11. https://bharatdiscovery.org/india
12. http://indianculture.gov.in